MHSO110015592014

**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ६२४/२०१४</u>**

आप्पासाो घाडगे विरुध्द धन्यकुमार गांधी

**<u>निशाणी क्र. ५२ वरील आदेश</u>**

सदरचा अर्ज वादी ने प्रतिवादी क्र. १९ ताराबाई जयसिंग जाधव यांचे वारस रेकॉर्डवर घेवून त्याकामी दुरुस्ती होवून मिळणबाबत सदरहु अर्ज केलेला आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा जाहीर ठराव, वाटप व निरंतर ताकीदीकामी केला आहे. प्रतिवादी क्र. १९ ताराबाई जयसिंग जाधव या दिनांक ३०.११.२०१९ रोजी मयत झाले आहेत. तरी दाव्यात त्यांच्या नावात कंस घालून त्याप्रमाणे दुरुस्ती करणेकामी तसेच त्या मयत झाल्याने सदर अर्जा मध्ये नमुद केलेल्या वारसाचा दाव्यात हक्क निर्माण झाला असुन त्यांना सदरहु अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे वारस आहेत. सबब प्रस्तावित अर्जात नमुद केलेले प्रतिवादी क्र. १९ ताराबाई जयसिंग जाधव यांचे वारसांना रेकॉर्डवर घेण्याची परवानगी मिळण्याची विनंती वादीने केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र १, ३, ५, ६ व ७ यांनी निशाणी क्र ५६ कडे म्हणणे सादर करुन सक्त हरकत नोंदविली आहे. प्रतिवादी क्र १, ३, ५, ६ व ७ यांचे असे कथन केले आहे की, दाव्यातील मिळकती एकत्र कुटुंबाच्या आहेत हे अद्याप शाबीत झालेले नाही. मयत प्रतिवादी क्र १९ ताराबाई ही वादीने नमूद केलेल्या दावा परिच्छेद २ मधील वंशावळी प्रमाणे सख्खी बहीण आहे आणि अर्जात नमूद केले प्रमाणे ती दिनांक ३०.११.२०१९ रोजी मयत झालेली आहे. वादीने ६ वर्षाच्या विलंबाने अर्ज दाखल केला आहे. अर्जात विलंबाचे कारण नमूद नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. प्रतिवादी क्र २, ४ व ८ ते १९ यांनी अर्जास म्हणणे सादर न केल्याने अर्ज त्यांच्या म्हणण्याविना पुढे चालविण्यात आला.

०५. दावा आणि अभिलेखावरील अर्जाचे अवलोकन केले. प्रस्तुत दावा दावा जाहीर ठराव, वाटप व निरंतर ताकीदीकामी केला आहे. अर्जाचे स्वरूप पाहता वादीने प्रस्तुत अर्ज मयत प्रतिवादी क्र. १९ ताराबाई जयसिंग जाधव यांच्या वारसाना दाव्याकामी सामील करण्यासाठी व दुरुस्ती करणेकामी दिलेला आहे. सदयस्थितीत त्याचा कोणताही तोटा प्रतिवादींना संभवत नाही. किंबहुना प्रतिवादी क्र. १९ ताराबाई जयसिंग जाधव यांचे वारस दाव्याकामी घेणे हे दाव्याच्या अंतिम निकालाकरिता आवश्यक बाब आहे. सबब प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे

## <u>आदेश</u>

१. सदरहु अर्ज निशाणी क्र. ५२ हा निशाणी क्र. ४८ व निशाणी क्र ५० वरील आदेशाची पुर्तता करण्याचे अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादीने रक्कम रूपये ५००/- (अक्षरी रूपये पाचशे मात्र) आज किंवा पुढील तारेखपर्यंत प्रतिवादींना देण्याच्या अटीवर प्रस्तुत अर्जात उल्लेखीत केलेनुसार मयत प्रतिवादी क्र. १९ ताराबाई जयसिंग जाधव यांचे वारस दाव्यामध्ये दुरूस्ती करून सामील करावेत तसेच दुरूस्त दाव्याची प्रत या आदेशापासुन १४ दिवसांचे आत अभिलेखावर दाखल करावे.

Digitally signed by RAJENDRA DHANAJI SHINDE
Date: 2026.08.13 17:48:28 +0530

(आर. डी. शिंदे)
४थे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
माळशिरस

दिनांक १३.०८.२०२६

## C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file order are same word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| **Name of the Court** | **:** | 4th Jt. C.J.J.D & J.M.F.C., Malshiras. |
| **Name of Stenographer** | **:** | Praveen Nagnath Nalla |
| **Order signed by the Presiding Officer on** | **:** | 18 / 12 / 2025. |
| **Order uploaded on** | **:** | 18 / 12 / 2025. |